जयसिंगपुर पोलीस ठाणे,कोल्हापुर
दुरध्वनी क्रमांक - ०२३२२२२५३३३
E-mail id – jaysingpurps.kop@mahapolie.gov.in

जयसिंगपुर पो. ठाणे जावक क्र. 5134 /२०२६ Exh.17 Order Seen. दिनांक 6 / 7 /२०२६

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE Date: 2026.07.06 17:29:50 +0530

प्रति,

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब,
प्रथमवर्ग न्यायालय, जयसिंगपुर यांचे सेवेशी,

**रिपोर्ट** :- युनूस चां इनामदार, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक - जयसिंगपुर पोलीस स्टेशन

**विषय** :- मुद्देमाल परत मिळण्याकरीता केलेल्या किरकोळ अर्जावर म्हणने सादर करीत असलेलेबाबत

**संदर्भ** :- मा. प्रथमवर्ग न्यायालय, जयसिंगपुर यांचेकडील किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ८४/२०२६

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की,

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | जयसिंगपुर ,जि.कोल्हापुर |
| गु.र.नं/ कलम | ७५/२०२६ महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ४५, ४६ सह भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५२, ३५१(२) प्रमाणे |
| तपास अधिकारी | पो.उप.नि.युनूस इनामदार , जयसिंगपुर पोलीस स्टेशन, जि. कोल्हापुर |
| फिर्यादी | सुनिल अशोक कोळी, व.व. ३९ धंदा- बांधकाम मटेरीअल सप्लायर, शिक्षण-१० वी, रा- बिरोबा मंदीर जवळ, धनगरवाडा, शिरोळ, ता- शिरोळ. मो.नं. ९८५०५९०७३६ |
| आरोपी | १ सागर अरविंद कांडेसार रा- गल्ली नं. १५, वरद कॉलनी, जयसिंगपूर. ता- शिरोळ. जि. कोल्हापुर (पाहिजे आरोपी)<br>२ अजय किरण मोहिते, रा. बिन्नीपेटी, वैशार गल्ली,बेडगी ता. हावेरी जि. हावेरी, सध्या रा. १५ वी गल्ली, जयसिंगपुर ता. शिरोळ जि. कोल्हापुर |
| घटनास्थळ व घ.ता.वेळ | दिनांक २२/०३/२०२५ ते दिनांक १२/०२/२०२६ रोजी अखेर गल्ली नं. ११, सागर ज्वेलर्स जयसिंगपूर ता- शिरोळ. येथे |
| दाखल ता वेळ | २३/०३/२०२६ रोजी २१.२८ वा |
| गुन्ह्यांचा हेतु | कोणताही वैध परवाना नसताना बेकायदेशीर रित्या सोने व दुचाकी वाहन तारण ठेवुन घेवुन व्याजाने पैसे देणे |

---

**गुन्हयाची थोडक्यात माहिती:-**

वरील तारखेस वेळी व ठिकाणी आरोपी याचा सागर ज्वेलर्स नावाचा सोन्याचे दुकाण असुन यातील आरोपीत याने त्याचेकडे कोणत्याही प्रकारचा खाजगी सावकारी परवाना नसताना फिर्यादीकडुन एकुण २७ तोळे सोने, १५० ग्रॅम चांदी व हिरो होंडा कंपनीची मोटार सायकल सी डी DAWN त्याचा रजि.नं. एम एच. ०९ बी यु. १८२२ हे वाहन गहाण ठेवुन फिर्यादी यास एकुण २०,५५,०००/- रुपये रक्कम ५% व्याजाने देवुन फिर्यादीकडुन एकुण २५,५९,४२०/- रुपये व्याजदरासह परतावा म्हणुन फिर्यादी याचे १८ तोळे सोने परत देवुन राहिलेले ९ तोळे सोने, १५० ग्रॅम चांदी व मोटार सायकल सह परत देणेसाठी आणखी ०९,००,०००/- रुपये जादा व्याजाची मागणी करुन व्याजाचे पैसे दिले नाही तर तुला काय करायचे ते कर, माझं कोण वाकडं करु शकत नाही. माझेकडे खोट्या तक्रारी देणा-या महीला आहेत, तुझ्यावर खोटी विनयभंगाची केस

करुन तुला जेलमध्ये पाठवतो असे म्हणुन शिवीगाळ करुन फिर्यादीस जिवे ठार मारण्याची धमकी दिलेने यातील फिर्यादी यांनी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहुन तक्रार दिलेने वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.

---

**तपास प्रगती –**

१. सदर गुन्हा दाखल असल्यापासुन नमुद आरोपी सागर अरविंद कांडेसर हा मिळुन आलेला असुन नसुन नमुद आरोपी याचे वडील अरविंद जगन्नाथ कांडेसर यांचेमार्फत आरोपी यास तपास कामी हजर राहणेबाबत बीएनएसएस कलम ३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आलेली असुन आज अखेर पोलीस ठाणे येथे हजर राहलेले नाही.

२. नमुद अर्जदार आरोपी याचेकडे सावकारकी बाबत कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झालेले आहे.

३. सदर गुन्हयांतील आरोपी नामे सागर अरविंद कांडेसर याने फिर्यादी सुनिल अशोक कोळी याचेकडुन तारण घेतलेले दुचाकी वाहन क्रमांक एम एच ०९ बी यु १८२२ हे तसेच एम एच ०९ एफ पी ९४८४ व एम एच ०९ सी एस ५२०७ असे दुचाकी वाहन त्याचा मित्र रोहित सुनिल भोसले याचेकडुन जप्ती करण्यात आलेले आहे.

४. फिर्यादी सुनिल अशोक कोळी तसेच इतर साक्षीदार याचेकडुन तारण घेतलेले सोन्याचे दागिने याव्यतिरिक्त इतर मोठया प्रमाणात सोन्याचे दागिने हे आरोपी याने त्याचे नातेवाईक अजय किरण मोहिते, आई रागिनी अरविंद कांडसर व वडील अरविंद जगन्नाथ कांडेसर यांचे नावे वेगवेगळया फायनान्स कंपनीत ठेवलेले असल्याचे तपास दरम्यान निष्पन्न झाले आहे.

५. नमुद गुन्ह्यांतील जप्ती करण्यात आलेले दुचाकी वाहन क्रमांक एम एच ०९ एफ पी ९४८४ वाहन हे आरोपी सागर अरविंद कांडेसर याने स्वप्निल सुरेश डोंगरे रा. जयसिंगपुर ता. शिरोळ जि. कोल्हापुर याचेकडुन बेकादेशीर रित्या तारण घेवुन त्यावर व्याजाने पैसे दिले असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

६. नमुद गुन्ह्यांतील आरोपी सागर अरविंद कांडेसर याचा वडगाव पोलीस ठाणे गुरंन ६२३/२०२४ बीएनएस कलम ३०५,३३१(४)(५) प्रमाणे दाखल गुन्ह्यांत सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असुन नमुद मुद्देमाल हा वडगाव पोलीस ठाणे कडील तपास अधिकारी यांनी तपास कामी जप्ती केलेले आहे.

७. नमुद गुन्ह्यांतील आरोपी याचे घर झडती घेण्यात आलेली असुन नमुद घरझडती दरम्यान आरोपी याचे घरातुन सोने खरेदी विक्री बाबत करार पत्र सापडलेले आहेत.

८. नमुद गुन्ह्यांतील तपास दरम्यान आरोपी सागर अरविंद कांडेसर याचा नातेवाईक अजय किरण मोहिते यास बीएनएसएस कलम १७९ व ९४ प्रमाणे पोलीस ठाणे जावक क्रमांक ३७१६/२०२६ दिनांक ०५/०५/२०२६ व ३८५०/२०२६ दिनांक ११/०५/२०२६ अन्वये नोटीस देवुन त्याचे नावे वेगवेगळया फायनान्स कंपन्यामध्ये ठेवलेल्या सोने याचे मालकी हक्काबाबत आवश्यक कागदपत्रे, तसेच सदर ठेवलेले सोने आपले असल्यास त्याची खरेदी बीलांसह आवश्यक्र कागदपत्रे व आपले उत्पन्नाबाबतची कागदपत्रे व सविस्तर माहितीसह पोलीस ठाणे जयसिंगपुर येथे हजर राहण्याबाबत कळवण्यात आलेले होते, परंतु नमुद इसम नामे अजय किरण मोहिते याने तारण ठेवलेले सोने बाबत अथवा इतर कोणतीही कागदपत्र सादर केलेली नाही.

९. फिर्यादी सुनिल अशोक कोळी याचेकडुन तारण घेतलेले सोन्याचे दागिने हे आरोपी याने त्याचे नातेवाईक अजय किरण मोहिते, रा. बिन्नीपेटी, वैशार गल्ली,बेडगी ता. हावेरी जि. हावेरी, सध्या रा. १५ वी गल्ली, जयसिंगपुर ता. शिरोळ जि. कोल्हापुर याचे नावे कॅपरी ग्लोबल कॅपिटल लि. शाखा जयसिंगपुर या कंपनीत ठेवलेले असल्याचे तपास दरम्यान निष्पन्न झाले असुन सदर मुद्देमाल तपास दरम्यान जप्ती करण्यात आलेले आहे.

१०. नमुद गुन्ह्यांमध्ये अजय किरण मोहिते, रा. बिन्नीपेटी, वैशार गल्ली,बेडगी ता. हावेरी जि. हावेरी, सध्या रा. १५ वी गल्ली, जयसिंगपुर ता. शिरोळ जि. कोल्हापुर याचा सहभाग निष्पन्न झालेने आरोपी क्रमांक ०२ म्हणुन समावेश करण्यात आला आहे.

११. नमुद आरोपी याने अजय किरण मोहिते याचे कडुन ओंकार बाबु आबरे रा. गल्ली नं १२, जयसिंगपुर ता. शिरोळ जि. कोल्हापुर याचेकडे गुन्ह्यांतील ठेवलेले दस्तऐवज जप्ती करण्यता आलेले आहे. सदर दस्तऐवज मध्ये दोन रक्कम् न् टाकलेले सही असलेले चेक तसेच इतर सोने तारण घेवुन कर्ज दिलेली नोंद असलेल्या रजिस्टर सापडलेले आहेत.

१२. नमुद तपास दरम्यान आरोपी याचे आई रागिनी अरविंद कांडेसर व वडील अरविंद जगन्नाथ कांडेसर यांना बीएनएसएस कलम १७९ व ९४ प्रमाणे नोटीस देवुन त्याचे नावे वेगवेगळया फायनान्स कंपन्यामध्ये ठेवलेल्या सोने याचे मालकी हक्काबाबत आवश्यक कागदपत्रे, तसेच सदर ठेवलेले सोने आपले असल्यास त्याची खरेदी बीलांसह आवश्यक कागदपत्रे व आपले उत्पन्नाबाबतची कागदपत्रे व सविस्तर माहितीसह पोलीस ठाणे जयसिंगपुर येथे हजर राहण्याबाबत कळवण्यात आलेले होते, परंतु नमुद इसम यांनी तारण ठेवलेले सोने बाबत अथवा इतर कोणतीही कागदपत्र सादर केलेली नाही.

१३. आरोपी याचे नातेवाईक रागिनी अरविंद कांडेसर व वडील अरविंद जगन्नाथ कांडेसर यांनी तारण ठेवुन कर्ज काढलल्या दागिन्यांचे मालकी हक्काबाबत कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत.

१४. नमुद अर्जदार याने वरील आरोपी क्रमांक ०२ व इतर नातेवाईक यांचे नावे सोने तारण ठेवुन कर्ज काढलेले असुन नमुद कर्ज खाते हे तात्पुरत्या स्वरुपात गोठवण्यात आलेले आहे.

---

**पुढील कारणास्तव सदर अर्ज नामंजुर करुन मुद्देमाल परत देण्यात येवु नये.**

१. नमुद गुन्ह्यांतील फिर्यादी याचेकडुन बेकायदेशीर रित्या तारण घेतलेले दागिन्यापैकी काही दागिने जप्ती करण्यात आलेले असुन उर्वरित दागिने बाबत तपास करुन सदर दागिने जप्ती करणे बाकी आहे.

२. नमुद अर्जदार हा नमुद गुन्ह्यांतील मुख्य आरोपी असुन नमुद आरोपी गुन्हा दाखल झालेपासुन फरारी असुन नमुद आरोपी याने नमुद गुन्ह्यांतील मुद्देमाल हा तारण ठेवुन कर्ज काढलेले असुन नमुद मुद्देमाल बाबत तपास करणेबाकी आहे.

३. नमुद अर्जदार आरोपी याने वरील तारण ठेवलेल्या दागिन्याच्या मालकी हक्काबाबत आज अखेर कोणतेही कागदपत्रे सादर केलेले नाहीत, तरी नमुद मुद्देमाल याचे मालकी हक्काबाबत तपास करणे बाकी आहे.

४. नमुद आरोपी हा चोरीतील दागिने याचीं खरेदीं विक्री करीत असल्याने नमुद दागिन्यांपैकी काही दागिने हे चोरीचे असल्याची शक्यता असल्याने त्याबाबत तपास करणे आहे.

५. नमुद गुन्ह्यांतील साक्षीदार याचेकडुन तारण घेतलेले दागिने हे नमुद खात्यामध्ये तारण ठेवुन कर्ज काढलेली असल्याची शक्यता असल्याने नमुद बाबत तपास करणे बाकी आहे.

६. सदर फ्रिज करण्यात आलेल्या खात्यामधील दागिने हे नमुद गुन्ह्यांतील फिर्यीदी प्रमाणे इतर लोकांकडुन तारण घेतलेले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

७. नमुद गोठवण्यात आलेले कर्ज खाते खुले केल्यास नमुद आरोपी त्यातील दागिने सोडावुन घेवुन त्याची विल्हेवाट लावण्याची शक्यता असुन नमुद मुद्देमाल हा मुळ मालकास परत करता येणे शक्य होणार नाही.

**तरी वरील अर्जदार आरोपी याचे गोठवण्यात आलेले कर्ज खाते खुल करण्यात येवु नये ही विनंत आहे.**

पोलीस निरीक्षक, जयसिंगपूर
पोलीस ठाणे, जयसिंगपूर
सत्यमेव जयते

दिनांक :- ०६/०७/२०२६
जयसिंगपुर पोलीस स्टेशन

तपासी अधिकारी
युनूस चां. इनामदार
पोउपनि/ पोस्टे जयसिंगपुर

दाखला पाहून रवाना
पोलीस निरीक्षक
जयसिंगपूर पोलीस ठाणे